नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/०३/२०२५ (सोमवार)**

---

## उपविभाग नागपुर अंतर्गत नविन तीन कायद्यांच्या प्रसार व प्रसिध्दीसाठी आयोजित करण्यात आली कार्यशाळा

मा श्री हर्ष ए.पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपुर ग्रामीण पोलीस विभागातर्फे महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या उपक्रम अंतर्गत संपूर्ण देशामध्ये लागू झालेल्या तीन नवीन कायद्याची ओळख होवुन प्रभावी अंमलबाजवणी होण्यासाठी आणि जनसामान्यांना १ जुलै २०२४ पासुन संपूर्ण देशामध्ये लागुन झालेल्या १. **भारतीय न्याय संहिता** , २. **भारतीय नागरिक सुरक्षा संहीता** ,३. **भारतीय साक्ष अधिनियम** या तीन नविन कायदयाची ओळख करून देण्याकामी आज दिनांक १०/०३/२०२५ रोजी उपविभाग नागपुर अंतर्गत बुटीबोरी मॅन्युफॅक्चरींग असोशिएशन बी.एम.ए. ,एम.आय.डी.सी बुटीबोरी येथील हॉल मध्ये कार्यशाळा आयोजीत करून मार्गदर्शन करण्यात आले . सदर कार्यशाळेचे आयोजन श्री दिपक अग्रवाल, सहा.पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी ,नागपुर विभाग यांनी केले असुन सदर कार्यशाळेमध्ये श्री अनिल मस्के, सहा.पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी ,सावनेर विभाग हे प्रमुख वक्ता म्हणुन हजर होते. तसेच सदर कार्यशाळेमध्ये श्रीमती प्रांजली बावणे,प्राध्यापिका,सिंम्बॉयसिस विधी महाविदयालय,नागपुर ,ॲडव्होकेट श्रीमती मंजुषा गिरडकर ,विधी अधिकारी ,उपविभाग रामटेक, ॲडव्होकेट श्रीमती सरोज मुन, विधी अधिकारी ,उपविभाग नागपुर, ॲडव्होकेट श्रीमती दिपीका महतकर, विधी अधिकारी ,उपविभाग कन्हान यांनी सुध्दा सविस्तर मार्गदर्शन केले.

सदर जनजागृती कार्यशाळेमध्ये श्री.सतिशसिंग राजपुत, पोलीस निरीक्षक ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी, श्री प्रतापराव भोसले, पोलीस निरीक्षक ,पोलीस स्टेशन ,श्री

चेतनसिंग चव्हाण, सहा.पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन बेला  तसेच बोरी नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बेला ,बुटीबोरी आणि एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत येणारे आदिवासी आश्रम शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक,विदयार्थी,स्थानिक लोकप्रतिनिधी,ग्रामपंचायत सरपंच ,उपसरपंच, सदस्य,जेष्ठ नागरीक, अंगणवाडी सेविका, अशा वर्कर,ग्रामसेवक, तलाठी, आशा वर्कर, महीला दक्षता समिती सदस्या ,तसेच बीएमए बुटीबोरी अंतर्गत येणाऱ्या कंपनीचे पदाधिकारी हजर होते. नागरिक,पोलीस पाटील आणि पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार  उपस्थित होते.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर